# अमरावती महानगरपालिका, अमरावती
## बांधकाम विभाग

# जाहिरात

अमरावती महानगरपालिका बांधकाम विभागाकडून प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत शहरस्तरीय तांत्रिक कक्ष स्थापन करण्यासाठी तिन पदांकरिता जाहिरात प्रसिद्ध करण्यात येत आहे. तरी खालील तक्त्यात नमूद पदे योजना पूर्ण होईल तोपर्यंतच्या कालावधी करिता खालील शैक्षणिक पात्रता धारण करणाऱ्या पात्र उमेदवाराकडून दरमहा एकवट मानधनावर करार पद्धतीने भरण्यात येत आहे. तरी इच्छुक उमेदवारांनी आपले आवेदन अर्ज पासपोर्ट फ़ोटोसह दिनांक.31/07/25पर्यंत बांधकाम विभागात सायंकाळी ५ वाजेपर्यंत पोहोचतील अशा बेताने पाठवावे.

| Sr. No | Specialist | No. of Post | Honorarium | Qualifications & Experience |
|---|---|---|---|---|
| 1 | **Municipal Engineer** | 1 | For Post Graduate with Min. 5 years' experience Rs. 60,000/-<br><br>For Graduate with Min. 3 years' experience Rs. 40,000/- | i. Post graduate OR Graduate in Civil Engineering<br>ii. At least 3 - 5 years of experience in procurement, design, and supervision of infrastructure works.<br>iii. Ability to assist ULBs to set standards and procedures for ensuring quality and monitoring compliances.<br>iv. Prior experience as municipal engineer will be an added advantage<br>v. Fluency in local language essential.<br>vi. Computer operation knowledge is necessary. |
| 2 | **MIS Specialist** | 1 | For Post Graduate with Min. 5 years' experience Rs. 60,000/-<br><br>For Graduate with Min. 3 years' experience Rs. 40,000/- | i. Post graduate OR Graduate in Computer Science/Electronics or MCA/PGDCA.<br>ii. 3-5 years of work experience in government/semi govt. / autonomous organizations/private company of repute.<br>iii. Experience in software development and database management.<br>iv. Prior experience as municipal engineer will be an added advantage<br>v.<br>vi. Fluency in local language essential. |
| 3 | **Social Development** | 1 | For Post Graduate with Min. 5 years' | i. Post graduate OR Graduate in Social Sciences, with practical experience of |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | Specialist | | experience Rs. 60,000/-<br><br>For Graduate with Min. 3 years' experience Rs. 40,000/- | working with community/slums in the urban area.<br>ii. 3-5 years' experience in undertaking social and community development initiatives and appraisals in the municipal environment.<br>iii. Experience in participatory methods, social mobilization, social analysis, resettlement and rehabilitation.<br>iv. Knowledge and experience in participatory planning and community mobilization. |

अटी व शर्ती :-

1. सदर नियुक्ती ही 11 महिने या कालावधी करिता पूर्णपणे तात्पुरत्या स्वरूपात करण्यात येणार असून निवड झालेल्या उमेदवारास 11 महिन्याचा नेमणूक कालावधी संपुष्टात आल्यानंतर पुढे मुदतवाढ देणे महानगरपालिकेवर बंधनकारक राहणार नाही तसेच त्यांना कोणतेही सेवा विषयक फायदे / सवलत देय राहणार नाही. त्याचा महानगरपालिकेतील आस्थापनेवरील कोणत्याही पदावर कायमस्वरूपी कोणताही अधिकार व हक्क राहणार नाही. त्यासाठी कोणत्याही न्यायालयात दावा दाखल करता येणार नाही असे ५०० रुपयाच्या स्टम्प पेपरवर शपथपत्र त्यांना द्यावे लागेल.
2. इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीसाठी येताना त्यांचा संपूर्ण परिचय पत्र, सर्व आवश्यक कागदपत्रे/ प्रमाणपत्राच्या दोन साक्षांकित प्रती व दोन पासपोर्ट साईज फोटोसह वेळेवर मुलाखतीकरता उपस्थित रहावे.
3. उमेदवारांचे वय हे 45 वर्षापेक्षा अधिक नसावे.
4. ज्या पदाकरिता उमेदवार अर्ज करतील त्या पाकिटावर पदाचे नाव ठळक अक्षरात लिहावे.
5. उमेदवारांना मुलाखती स्वखर्चाने उपस्थित राहायचे आहे.
6. आपले नियुक्ती ही ठराविक कालावधीसाठी असून काम पूर्ण झाल्यानंतर लगेच करण्यात आलेली तात्पुरती नियुक्ती ही संपुष्टात येईल.
7. सदर जाहिरातीनुसार झालेली परिस्थिती प्रक्रिया व अटी शर्ती कोणत्याही टप्प्यावर कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार माननीय आयुक्त महानगरपालिका अमरावती यांनी राखून ठेवलेले आहे.
8. उपरोक्त दर्शविल्याप्रमाणे पदाकरिता आवश्यक शैक्षणिक पात्रता उमेदवार धारण करीत नसल्यास शैक्षणिक पात्रता शिथिल करण्याचे अधिकार माननीय आयुक्त महानगरपालिका अमरावती यांनी राखून ठेवलेले आहे.
9. उमेदवाराची वर्तणूक हि कार्यालयीन कामकाजास शोभनीय नसल्यास आपणास कोणतेही नोटीस न देता कामावरून कमी करण्याचे अधिकार मा. आयुक्त, महानगरपालिका यांना राहतील.
10. सदर जाहिराती अमरावती महानगरपालिकेच्या संकेतस्थळ www.amtcorp.org यावर उपलब्ध आहे.

अमरावती महानगरपालिका
प्रधानमंत्री आवास योजना
अमरावती

उपायुक्त (सा)
महानगर पालिका, अमरावती.